# बृहन्मुंबई महानगरपालिका

## ई-दरपत्रिका

क्रमांक :- सआके/पू/२०८०/सअ(परि.)/जन. दिनांक : २९/०८/२०२४

सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग कार्यालयीन इमारत,
खोली क्र. १०१ पहिला माळा,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व)
मुबंई-४०००६९.
दूरध्वनी क्र. ०२२-२६८३७१०४.

के/पूर्व विभागातील सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांच्या मंजूरीनुसार खाली दर्शविलेल्या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यता प्राप्त संस्था / कंत्राट्दारांकडून तातडीच्या कामासाठी, तात्काळ निविदा / दरपत्रिका मागविण्यात येत आहेत. मान्यताप्राप्त इच्छुक संस्था / कंत्राट्दारांनी दिनांक ३०/०८/२०२४ ते ०३/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत दूसरा मजला, मुख्य लिपिक (व्यय), के/पूर्व विभाग यांजकडून रु.३००/- अधिक वस्तू व सेवा कर (GST) इतकी रक्कम भरून निविदा / दरपत्रिका फॉर्म खरेदी करण्यात यावा.

इसारा अनामत रक्कम (EMD) रु.६०००/- DD/CASH द्वारे भरून त्याची पावती निविदा / दरपत्रिकेच्या लिफाप्या सोबत जोडण्यात यावी व मुख्य लिपिक (व्यय) के/पूर्व विभागातील निविदा / दरपत्रिका पेटीमध्ये मोहरबंद निविदा / दरपत्रिका लिफाफा टाकण्यात यावा व तो लिफाफा त्याच दिवशी म्हणजे दिनांक ०३/०९/२०२४ ला दुपारी ०३.०० वाजता किंवा त्यानंतर उघडण्यात येईल.

तसेच मोहरबंद निविदा / दरपत्रिका स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संपूर्णपणे मा. सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली स्थळ निविदा / दरपत्रिका स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | के/पूर्व विभागातील प्रभाग क्र. ८४ मधील शहाजी राजे व्यायामशाळा, शहाजी राजे मार्ग, विले पार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७ येथील कृत्रीम तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२४ करिता, प्रत्येकी १००००.०० लिटर क्षमतेचे आवश्यक पाण्याचे टॅंकर तसेच ताडपत्री पुरविणेबाबत. | रु.२६२४३२/-<br>(वस्तू व सेवा कर सहित) |

आगामी श्री. गणेश उत्सव - २०२४, दिनांक ०७/०९/२०२४ ते १७/०९/२०२४ पर्यंत असून, श्री. गणेश मूर्त्यांच्या विसर्जनाच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

दिनांक ०८/०९/२०२४ (दीड दिवस), ११/०९/२०२४ (पाचवा दिवस), १२/०९/२०२४ (गौरी विसर्जन), १३/०९/२०२४ (सातवा दिवस) आणि १७/०९/२०२४ (अकरावा दिवस / अनंत चतुर्दशी).

नोंद : सदर स्थळ निविदेमध्ये काही बदल झाल्यास सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.

सही/-

सहाय्यक अभियंता (परिरक्षण-१) के/पूर्व विभाग